# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २९.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २८/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २४३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,८८,३००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२८/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन १२१.३२ लिटर दारू असा एकुण १,६१,४००/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—**दिनांक २८/११/२०२२ रोजी पोस्टे कळमनुरी येथे कलम २७९,३०४(अ),३३७,३३८ भादवी कलम १८४ मो.वा.का अन्वये गुन्हा दाखल असुन लक्झरी क्र.एम.एच.३८ एफ १३६१ चा चालक याचेवर गुन्हा दाखल होवुन या संदर्भात बाळापुर पोलीस तपास करित आहेत

**चोरी :—** दिनांक २८/११/२०२२ रोजी फिर्यादी गोविंद मारोती सपकाळ वय ३६ वर्ष व्य. किराणा दुकान चालक,रा.लक्ष्मीनगर वसमत यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ४५७,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन २५.११.२२ रोजी चे २१:०० ते २६.११.२२ रोजीचे ०७:३० वा चे सुमारास वसमत येथील देशपांडे कॉम्पलेक्स बॅक कॉलनी येथील न्यु कन्हेरगावकर किराणा ॲन्ड जनरल स्टेअर्स दुकानातुन अज्ञात चोरटयांनी दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन दुकानात प्रवेश करून दुकानातील नगदी तिन हजार रू किराणा दुकानातील सामान असा एकुण ९३७०० रू कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.

दिनांक २८/११/२०२२ रोजी फिर्यादी अशोक तुळशीराम लांडगे वय ५५ वर्ष व्य.शेती रा.बळेगाव ता.वसमत जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हटटा येथे कलम ३९२,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२७.११.२२ रोजी चे २२:४५ वा चे सुमारास मौजे सातेफळ पाटी जवळ परभणी ते वसमत जाणारे रोडवर यातील अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून हमरस्त्यावर सुर्यास्त व सुर्योदय यांच्या दरम्याण फिर्यादी हा डिझेल घेवुन जात असतांना फिर्यादीस पाठीमागुन लाथ मारून मो.सा.सह खाली पाडुन त्यांचेकडील चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे शर्टच्या खिश्यातील नगदी १७,००० रू बळजबरीने चोरून नेले. तसेच फिर्यादीची मो. सा.क्र.एम.एच.३८ए.ए.८५२४ हि पळवुन नेली म्हणुन गुन्हा.म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.

दिनांक.२८/११/२०२२ रोजी फिर्यादी रितेश बबनराव चाकोतकर वय ३६ वर्ष व्य. व्यापार रा.महदेव गल्ली आ.बाळापुर ता.कळमुनरी यांचे फिर्यादी वरून पोस्टे बाळापुर येथे ३८०,४६१ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन २६.११.२२ रोजीचे १७:०० पासुन ते २८.११. २२ रोजीचे १०:०० वा मौजे बोल्डा फाटा येथील रेल्वे स्टेशन जाणारे रोडवरील गुरूकृपा

दुकाणात व दुधाधारी ट्रेडर्स ॲल्युमिनीअम वर्क दुकाणात यातील अज्ञात चोरटयांनी सोन्या चांदीचे दागीने व दुकानातील साहित्य असा एकुण ३४,००० रू मुद्देमाल चोरून नेले आहे म्हणुन गुन्हा. दाखल होवुन या संदर्भात हटटा पोलीस तपास करित आहेत.

फसवणुकः— दिनांक २८/११/२०२२ रोजी फिर्यादी गणेश भानुदास टेकाळे वय २७ वर्ष व्य.. शेती रा.केसापुर यांचे फिर्यादी वरून पोस्टे नर्सी ना. येथे कलम ४२० भादवी सह कलम ६६(ड) महिती तंत्रज्ञान अधी. प्रमाणे गुन्हा दाखल असुन ०१.११.२२ रोजी पासुन ते दि.०५.११. २२ रोजी पावेतो ईसम नाव गाव माहिती नाही फोन पे व ऑनलाईन ई सेवा केद्राव्दारे ऑनलाईन म्हशीचे फोटो पाहुन आवडल्याने खरेदी करीता नमुद फोन पे क्र.९०४४९०९२५४ व ७६९९३४५४७६ वर ऑनलाईन एकुण.२,२६,३२४ रू मार्फतीने पाठवुन सुध्दा ऑनलाईन पाहिलेल्या दोन म्हशी हे देण्यास टाळाटाळ करत असल्याने ऑनलाईन फोन पे व सेवा केंद्राव्दारे फिर्यादीची टाकलेल्या पैश्याची फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात नर्सी नामदेव पोलीस तपास करित आहेत.